गांवकरी - दि. 8th Feb. 09.




# श्री सत्यसाई मोबाईल मेडिकेअर व्हॅन जळगांवात लवकरच

जळगाव :- येथील श्री सत्यसाईबाबांच्या प्रेरणेने आषाढी एकादशीपासून श्री सत्यसाई बुक अॅण्ड ट्रस्ट पब्लिकेशनतर्फे मोबाईल मेडिक्लेअर प्रोजेक्ट (व्हॅन) सुरू करण्यात आली.

या उद्दीष्टांवर आधारीत हा उपक्रम महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांकरीता राबविण्यात आलेले आहे.

१६ जुलै २००८ ते आजपर्यंत (सहा महिने) १ लाख ५३ हजार रूग्ण सदर मोबाईल व्हॅनच्या साहय्याने तपासणी करण्यात आली. महाराष्ट्रात १०८ मोबाईल मेडिकेयर व्हॅन देण्याचा संपल्प सत्यसाई बुक पब्लिकेशन ने केला आहे. नुकतीच नागपूर येथे मोबाईल मेडिकेयर व्हॅन देण्यात आली. लवकरच जळगांव जिल्ह्याकरीता अशी उपलब्ध होत आहे. सदरील व्हॅन १६ लाख रू. किंमतीची असून त्यात ईसीजी मशीन, प्रेगनन्सी टेस्ट कीट, शुगर चेकअप, नेब्युलायझेशन (दम्याकरीता) लागणारे मशीन आणि मोफत औषधी देण्यात येते. त्याच बरोबर समाजात आरोग्य स्वच्छतेची माहिती देणाऱ्या सिडी दाखविण्यात येतात. सर्व साई सेवक आतुरतेने सदर व्हॅनची प्रतिक्षा करत असुन ती व्हॅन जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्गम भागात (एक अत्यावश्यक विनामुल्य सेवाभावी उपक्रम) एक वरदान ठरणार आहे.

व्हॅनने व्यवस्थापन साईसेवकांकडे राहील. तसेच अधिक माहितीसाठी श्री नामपूरकर भ्रमणध्वनी ९२२५१२१३७२ आणि सुनिल (दसनुर) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन सत्यसाई पोषक आहारचे राज्य समन्वयक अविनाश कुळकर्णी यांनी केले आहे.

देशदूत - दि. 8th Feb. 09.




*मोबाईल व्हॅनसह सत्यसाई व भाविक.*

# श्री सत्यसाई मोबाईल मेडिकेयर व्हॅन लवकरच शहरात

**जळगाव, दि.७(प्रतिनिधी)**- श्री सत्यसाई बुक अ‍ॅण्ड ट्रस्ट पल्बिकेशनतर्फे अत्याधुनिक मेबईल मेडिक्लेअर प्रोजेक्ट (व्हॅन) रुग्णाल्यासाठी जीवन संजीवनी ठरणारी व्हॅन लवकरच जळगावात दाखल होणार आहे.

१ लाख ५३ हजार रुग्णांची या व्हॅन द्वारा आतापर्यंत तपासणी करण्यात आली आहे. महाराष्ट्रात अशा प्रकारच्या १०८ मोबाईल मेडिकेयर व्हॅन देण्याचा संकल्प सत्यसाई बुक पब्लिकेशन ने केला आहे. लवकरच जळगाव जिल्ह्याकरीता अशी व्हॅन उपलब्ध होत आहे. सदरील व्हॅन १६ लाख रु. किंमतीची असून त्यात ईसीजी मशिन, प्रगनन्सी टेस्ट कीट, शुगर चेकअप, नेब्युलायझेशन (दम्याकरीता) लागणारे मशिन आणि मोफत औषधी देण्यातयेते. त्याच बरोबर समाजात आरोग्य स्वच्छतेची माहिती देणाऱ्या सीडी दाखविण्यात येतात. ही व्हॅन जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्गम भागात (एक अत्यावश्यक विनामुल्य सेवाभावी उपक्रम) एक वरदान ठरणार आहे.

सदर व्हॅनचे व्यवस्थापन साईसेवकांकडे राहिल. तसेच अधिक माहितीसाठी श्री. नामपुरकर ९२२५१२१३७२ आणि सुनील पाटील, दसनुर यांच्याशी संपर्क साधला, असे आवाहन सत्यसाई पोषक आहारचे राज्य समन्वयक अविनाश कुळकर्णी यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे.